# रयत शिक्षण संस्था, सातारा

कर्मवीर समाधी परिसर, सातारा

उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग व तांत्रिक विभाग

परिपत्रक क्र. १३ ,दि. ०१/०६/२०१७

प्रति,
सर्व शाखाप्रमुख,
उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग, व तांत्रिक विभाग.
रयत शिक्षण संस्था.

## १. एच.एस.सी परीक्षा निकाल फेब्रुवारी / मार्च २०१७ –

महाराष्ट्र राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षा महामंडळामार्फत फेब्रुवारी / मार्च २०१७ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा / उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (+२) विभागाकडील इ.१२ वी चे निकाल ऑन लाईन जाहीर झालेले असून, सदर निकालाची माहिती आपल्या विभागीय कार्यालयाने दिलेल्या नमुन्यात तयार करून तात्काळ पाठवावी. तसेच आपल्या शाखेचा इ.१२ वी चा निकाल हा बोर्डाच्या निकालापेक्षा कमी असल्यास तो कमी का लागला याची कारणे व संबंधित शिक्षकाचा खुलासा आपल्या स्पष्ट अभिप्रायासह विभागीय व संस्था कार्यालयास पाठवावा.

## २. सेवक संच निश्चिती :-

अनुदानित / विनाअनुदानित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाकडील शै. वर्ष २०१६-१७ ची संच निश्चिती online चालू असून, काही विभागामध्ये संच निश्चिती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. तेंव्हा सर्व अनुदानित / विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित शाखांनी संच निश्चिती होताच त्याची प्रत संस्था कार्यालयाकडे junior@rayatshikshan.edu या ई-मेल आयडी वरती व एक प्रत विभागीय कार्यालयास पाठवावी.

### अ) विनाअनुदानित विभाग –

विनाअनुदानित विभागाकडील (विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित) शै. वर्ष २०१६-२०१७ मधील संच निश्चितीनुसार मंजूर कार्यभारानुसार सर्व विषयांना तासिका तत्वावर प्रथम/द्वितीय सत्राअखेर नियुक्त्या दिल्या जातील. त्याप्रमाणे उपलब्ध विषयाच्या तासिके प्रमाणे मानधन अदा करावे याबबत अधिक माहितीसाठी संस्थेकडील परिपत्रक क्र.१२ दि.०७/०६/२०१६चे अवलोकन करावे.

### ब) अनुदानित विभाग –

अनुदानित विभागाकडील सेवानिवृत्ती/राजीनामे/स्वेच्छा सेवानिवृत्ती व निधन इ.कारणामुळे रिक्त असणा-या जागेवर त्या त्या विषयाच्या नियुक्त्या तासिका तत्वावर प्रथम / द्वितीय सत्राअखेर दिल्या जातील. त्यामध्ये मानधनाचा उल्लेख असणार नाही. याबावत संस्थेकडील संस्थेकडील परिपत्रक क्र.१२ दि.०७/०६/२०१६चे अवलोकन करावे.

## ३. हंगामी नियुक्त्या बाबत :-

संस्थेच्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये/ व्यवसाय अभ्यासक्रम व तांत्रिक विभागाकडील अनुदानित /विनाअनुदानित विभागाकडील शै. वर्ष २०१७-१८ साठी रिक्त असलेल्या व होणा-या पदांवर हंगामी सेवकांच्या नियुक्त्या करण्यासाठी उपलब्ध कार्यभार विचारात घेऊन विषयानुसार खालील नमुन्यात मागणी करावी.

| अ.क्र. | विषयाचे नाव | अनुदानित / विना अनुदानित | नियुक्तीचा प्रकार पूर्णवेळ /अर्धवेळ/ सीएचबी/ | गतवर्षातील कार्यरत सेवकाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|

तसेच गतवर्षी द्वितीय सत्रातील ज्या हंगामी सेवकाचे शैक्षणिक कामकाज समाधानकारक नाही. अशा सेवकांची नावे आपल्या स्पष्ट अभिप्रायासह संस्था कार्यालयाकडे वेळीच कळवावी.

**४. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाकडील भाषा विषयाच्या नियुक्तीबाबत :-**

अनुदानित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाकडील व्यवसाय अभ्यासक्रमाकडे भाषा (इंग्रजी,मराठी व पायाभूत अभ्यासक्रम) इत्यादी विषयाच्या अभ्यासक्रमासाठी तासिका तत्वावर नियुक्त्या केल्या जातात. अशा नियुक्त्या करीत असताना शासन नियमाप्रमाणे दरवर्षी नवीन उमेदवारांच्या किंवा उमेदवार अदला-बदलीने नियुक्त्या कराव्या लागतात. तरच व्यवसाय शिक्षण विभागाकडून मान्यता दिली जाते. पर्यायाने अशा सेवकांची संख्या दरवर्षी वाढत जाऊन त्यांना पुनर्नियुक्ती देणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे संस्थेने व्यवसाय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार चालू शैक्षणिक वर्षापासून अशा शाखेतील माध्यमिक, उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयातील स्थायी स्वरूपात कार्यरत असणा-या पात्र शिक्षकांना तासिका तत्वावर नियुक्त्या दिल्या जातील. तसेच संबंधित शाखेत असे शिक्षक उपलब्ध झाले नाहीत तर अशा ठिकाणी Walk in Interview मधील उमेदवारांना नियुक्त्या दिल्या जातील. त्याप्रमाणे तासिका तत्वावरील नियुक्तीसाठी आपल्या शाखेतील मराठी व इंग्रजी पात्र सेवकांची नावे कळवावीत. अशा सेवकांनी काम करण्यास नकार दिल्यास तसे लेखी घेऊन आपल्या शिफारशीसह या कार्यालयाकडे वेळीच कळवावे.

**५. प्रस्तावित पदे**

अनुदानित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाकडील शै.वर्ष २०१६-१७ च्या संच निश्चितीमध्ये विद्यार्थी संख्या विचारात घेऊन एखाद्या विषयाच्या कार्यभारात वाढ झाली असल्यास अथवा या पूर्वी प्रस्तावित पद मंजूर असल्यास त्याची माहिती विषय व कार्यभारानुसार स्वतंत्र कळवावी. याप्रमाणे कार्यवाही वेळच्या वेळी होईल, याची दक्षता घ्यावी.

रयत शिक्षण संस्था सातारा

(प्रिं.डॉ.भाऊसाहेब कराळे)
सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहितीसाठी,

१. सहसचिव (उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा
२. सहसचिव (माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा
३. ऑडीटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
४. विभागीय अधिकारी, माध्य,दक्षिण,उत्तर,पश्चिम व रायगड विभाग.